# दहशतवाद रोखण्यासाठी भारताने केलेले कायदे व सुरक्षा

**संशोधक**
**प्रा.दिपकराव बाबुराव देवरे**
संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग
पंकज कला व विज्ञान महाविद्यालय
चोपडा. ता.चोपडा जि.जळगाव
E-Mail-dipakrao.deore@gmail.com
Mobile-9834652792

**मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. एस. पी. ढाके**
विभाग प्रमुख, संरक्षण व सामरिक शास्त्र
कै.म.दि.सिसोदे उर्फ भाऊसाहेब कला व वाणिज्य
महाविद्यालय नरडाणा ता.शिंदखेडा जि. धुळे

---

भारताला स्वातंत्र्यानंतर अंतर्गत सुरक्षा व बाह्य सुरक्षा या दोन्ही आघाड्यांवर धोका जाणवू लागला. पाकिस्तान व चीन कडून निर्माण झालेला धोका तसेच पाकिस्तान व चीन कडून भारतात पसरत जाणारा दहशतवाद यामुळे भारताला त्यासाठी विशेष कायदे करणे जरुरीचे वाटू लागले. भारताने दहशतवाद्यांची चर्चा तर कधी कारवाई तर कधी शस्त्रसंधी करून दहशतवादी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न केले पण त्यात मोठ्या प्रमाणात यश मिळाले नाही. राष्ट्रीय सुरक्षा कायदा मिसा टाडा हे कायदे दहशतवादी कारवाया रोखण्यास कमी पडले. तसेच यांचा उपयोग राजकीय स्वार्थासाठी पण झाला त्यामुळे हे कायदे मागे पडले. 11 सप्टेंबर 2001 च्या घटनेनंतर भारताची अंतर्गत सुरक्षा चांगली रहावी यासाठी पोटा कायद्याचा अध्यादेश काढला पण त्यास भारतातील राजकीय पक्षांनी विरोध दर्शविला त्यात सुधारणा करून पोटा कायदा अस्तित्वात आणला गेला. 13 डिसेंबर 2001 च्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताला दहशतवाद प्रतिबंधक पोटाची नितांत आवश्यकता आहे हे जाणवले पण त्याचा दुरुपयोग करणे टाळणे योग्य ठरेल तरच हा कायदा यशस्वी होईल. सदर संशोधनात दहशतवादी संघटना व दहशतवाद्यांवर जरब बसवण्यासाठी भारतात कोणते कायदे करण्यात आले आहेत. याची थोडक्यात माहिती घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच दहशतवाद विरोधी विविध कायद्यांची थोडक्यात ओळख करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

1. अनलाफुल ऍक्टिव्हिटीज प्रिव्हेन्शन ॲक्ट 1967
2. टेररिस्ट अँड डिसरप्टिव्ह प्रिव्हेन्शन ॲक्ट (टाडा) 1985
3. प्रिव्हेन्शन ऑफ टेररिझम ॲक्ट (पोटा) 2002
4. नॅशनल इंटेलिजन्स ॲक्ट 2008

**1. अनलाफुल ऍक्टिव्हिटीज प्रिव्हेन्शन ॲक्ट 1967 :**

भारत सरकारने 1967 साली दहशतवादात सामील असलेल्या व्यक्तींवर व संघटनांवर कारवाई करण्यासाठी हा कायदा पारित केला होता. मुख्य म्हणजे नक्षलवादावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्याची सुरुवात झाली. 1969,1972,1986, 2004, 2008 व 2012 मध्ये त्यात सुधारणा झाल्या. या कायद्यांतर्गत आर्थिक गुन्हे करणाऱ्या वरही कारवाई करता येते. या कायद्यानुसार दहशतवादी गुन्ह्यात भारत देशाच्या आर्थिक सुरक्षेला धोका पोहोचवणाऱ्या घटनांचा समावेश होतो. शस्त्र जमा करणे, दहशतवादासाठी निधी गोळा करणे, बनावट नोटा छापणे या गुन्ह्यांचा या कायद्यात समावेश होतो. या कायद्याने आरोपीची संपत्ती ताब्यात घेणे, जितक्या बनावट नोटा सापडल्या तितकी रक्कम वसूल करणे हे अधिकार पोलिसांना आहेत.

**2. टेरेरिस्ट अँड डिसरप्टिव्ह प्रिव्हेन्शन ॲक्ट (टाडा) 1985 :**

हा कायदा टाडा या नावाने ओळखला जातो. तो 1985 ते 1995 दरम्यान संपूर्ण देशभर लागू होता. 1987 मध्ये त्यात सुधारणा करण्यात आली. मुख्य म्हणजे पंजाब मधील दहशतवादावर नियंत्रण ठेवण्यासाठी हा कायदा लागू करण्यात आला होता. या कायद्याचा गैरवापर झाल्याचे आरोप झाल्यानंतर तो रद्द करण्यात आला. या कायद्याअंतर्गत अटक झालेल्या व्यक्तीला हेबीएस कॉपर्स या नाकारण्यात आला. तसेच एक वर्ष चार्जशीट दाखल न करता आरोपीस ताब्यात ठेवण्याचा अधिकार दिला होता. तसेच मी गुन्हेगार नाही, हा पुरावा देण्याची जबाबदारी आरोपीवर सोपविण्यात आली होती. या कायद्याच्या 7 अ कलमानुसार पोलीस अधिकाऱ्यांना आरोपीची संपत्ती ताब्यात घेण्याचा अधिकार देण्यात आला होता.

**3. प्रिव्हेन्शन ऑफ टेररिझम ॲक्ट (पोटा) 2002 :**

2002 यावर्षी भारताच्या संसदेने पारित केलेला हा दहशतवाद विरोधी कायदा 2004 पर्यंत होता. डिसेंबर 2001 मध्ये दिल्लीत भारतीय संसदेवर झालेल्या हल्ल्यानंतर सदर कायदा लागू झाला. या कायद्यातील अनेक तरतुदी टाडा कायद्या सारख्या होत्या. त्यानुसार पोलिसांना संशयित व्यक्तीला 180 दिवसांपर्यंत चार्जशीट दाखल न करता ठेवता यायचे.

**4. नॅशनल इंटेलिजन्स ॲक्ट 2008 :**

डिसेंबर 2008 मध्ये भारतीय संसदेने सदर कायदा पारित केला. त्याद्वारे केंद्र सरकारला देशातील कोणत्याही ठिकाणी झालेल्या घातपाती आणि दहशतवादी कारवायांचा तपास करता येतो. या घातपाती कारवाया मध्ये बॉम्बस्पोट, विमान आणि बोटींच्या अपहरण, आणविक प्रकल्पांवर हल्ला, भारताच्या एकात्मतेला व सार्वभौमत्वाला आव्हान याशी संबंधित गुन्ह्यांचा समावेश होतो. या अंतर्गत गुन्हे चालविण्यासाठी विशेष न्यायालयाची निर्मिती करावी लागते. त्यासाठीच न्यायालय संबंधित पोलिस ठाण्यांच्या आवारात एनआयए कायद्यातील सेक्शन 11 आणि 22 नुसार निर्माण केली जातात. संबंधित उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाच्या शिफारशी वरून केंद्र सरकार अशा विशेष न्यायालयातील न्यायाधीशाची नेमणूक करते. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला अशा विशेष न्यायालयातील खटले हस्तांतरित करण्याचा अधिकार आहे. सीआरपीसी 1973 मधील अनेक तरतुदी या कायद्यानुसार सुधारित करण्यात आल्या आहेत. सध्या देशात 37 विशेष एनआयए कोर्स कार्यरत आहेत.

**दहशतवाद रोखण्यासाठी महाराष्ट्र सरकारने केलेला कायदा :-**

**महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा 1999 (MCOCA) :**

महाराष्ट्रातील संघटित गुन्हेगारीचा वाढता धोका लक्षात घेऊन त्याला आळा घालण्यासाठी हा कायदा करण्यात आला. मुंबई भारताची आर्थिक राजधानी असल्याने गुन्हेगारांचे लक्ष म्हणून केंद्रस्थानी राहिली आहे. अलीकडील काही वर्षात गुन्हेगारी उदा. हिंदी चित्रपट सृष्टीशी प्रतिष्ठित संबंधित खून, तसेच बांधकाम व्यवसायिक, व्यावसायिकांकडून खंडणी गोळा करणे, अपहरण इ. वरून असे दिसते की शहरात गुन्हेगारी टोळ्या कार्यरत आहेत. यावर उपाय करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यात अजून काही कायद्यांची भरणे आवश्यक आहे हे जाणून हा कायदा निर्माण केला गेला. गुन्हेगारी टोळयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायद्याची गरज आहे हे नाकारता येत नाही टाडा हा दहशतवाद्यांविरुद्ध चा कायदा होता. संघटित गुन्हेगारी हा दहशतवादाचा एक प्रकार

IMPACT FACTOR 5.473(SJIF)

**UPA NATIONAL E-JOURNAL**

*Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal*

*Volume -8 : Issue-1 (February-2022)*

ISSN 2455-4375

आहे म्हणूनच महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा तयार केला गेला. 24 फेब्रुवारी 1999 पासून तो अमलात आला. हा कायदा टाडा पेक्षा काही बाबतीत वेगळा आहे. संघटित गुन्हेगारी गेल्या काही वर्षात आपल्या समाजात फारच धोकादायक बाब ठरली आहे. तिला राष्ट्रीय सीमा नाहीत, तिजोऱ्या फोडणे, पैशांसाठी अपहरण करणे, चोरटा व्यापार, पिळवणूक अंमली पदार्थांचा व्यापार, सुपारी घेणे अशा अनैतिक मार्गाने ही संघटित गुन्हेगारी पोसली जाते. त्यासाठी दूरध्वनी व तोंडी संभाषण याचा सर्वात जास्त उपयोग केला जातो. अस्तित्वात असलेल्या कायद्याची रचना म्हणजे पिनल आणि प्रोसिजरल कायदा आणि न्याय व्यवस्था संघटित गुन्हेगारी वर ताबा मिळवण्यात कुचकामी ठरले आहे. यावर उपाय म्हणून सरकारने काही ठराविक कारणाने वायर्स तोडण्याचे अधिकार देणारा खडक व प्रतिबंधक संयुक्त विशेष कायदा करण्याचे ठरवले या कायद्यामुळे खालील प्रकारे शिक्षा होऊ शकते.

1. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू करेपर्यंत संघटित गुन्हेगारी प्रयत्न यासाठी फाशीची शिक्षा किंवा आजन्म कारावास अथवा दंड
2. संघटित मदत करणे किंवा गुन्हेगारी कृत्य साथ/ प्रोत्साहन देणे किंवा संघटीत गुन्हा करण्याची तयारी करणे यासाठी आजन्म कारावास अथवा दंड. कमीत कमी कारावास पाच वर्षाचा केला आहे.
3. संघटित गुन्ह्यात अडकलेल्या व्यक्तीला आश्रय देणे किंवा त्याचा बचाव करणे कमीत कमी शिक्षा पाच वर्षे आणि जास्तीत जास्त आजन्म कारावास.
4. संघटित गुन्हेगारीत सहभाग कमीत कमी शिक्षा पाच वर्षे व जास्तीत जास्त आजन्म कारावास.
5. संघटित पुण्यातून मिळालेली संपत्ती स्वतःच्या व ठेवणे कमीत कमी तीन वर्षे व जास्तीत जास्त आजन्म कारावास
6. संघटित गुन्हात सहभागी व्यक्तीची मालमत्ता आपल्या ताब्यात ठेवणे शिक्षा कमीत कमी तीन वर्ष, जास्तीत जास्त दहा वर्षे आणि दंड एक लाख रुपये सेक्शन 20 नुसार अशी संपत्ती जप्त करून तिचा लिलाव केला जातो. न मिळालेली संपत्ती स्वतः जवळ ठेवूणे कमीत कमी तीन वर्षे व जास्तीत जास्त आजन्म कारावास.

**सारांश :-**

भारताची सुरक्षा दहशतवादाने डळमळीत झालेली आहे. भारतापुढे सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य स्वरूपाच्या समस्या असताना दहशतवाद्यांच्या हिंसात्मक कारवाईने विकास कार्य ठप्प झालेले आहेत. दहशतवाद पंजाब , जम्मू-काश्मीरमध्येच सीमित राहिलेला नाही, हळूहळू सर्वच राज्यात त्याचा प्रसार झालेला आहे. दहशतवादामुळे सुरक्षेची भावनाही नष्ट झाली आहे किंबहुना होऊ पहात आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शास्त्रीय इत्यादी सर्व स्तरावर दहशतवादाची पाळेमुळे उघडून नष्ट करण्याची वेळ आलेली आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


- विसपुते देवेन्द्र, तोडकर बी. डी. धर्माधिकारी कविता, जागतिक सुरक्षा, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव- 2015
- तोडकर बी. डी.:- भारतीय राष्ट्रीय सुरक्षा, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव-2016
- जाधव व्ही. वाय., पाटील होमसिंग:- जागतिक सुरक्षा, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव- 2009
- https://www.studycircleonline.com